MHKO150000932015

नि.दि.दावा. क्र. १७/२०१५

विशाल व इतर वि. रॉबर्ट व इतर.

## निशाणी क्रमांक ८७ खालील आदेश.

**१.** त्रयस्थ अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे त्याला दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ट करण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदाराचे थोडक्यात कथन की, या दाव्यातील प्रतिवादी क्र. १ ते ४ हे त्याचे सख्खे बहिण–भाऊ आहेत. दावा मिळकतीचे मालक व वादींच्या पुर्वहक्कदारांनी गट क्र. २१७ पैकी ०.०६ आर जमीन त्याला प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या पुर्वहक्कदारांच्या ताब्यात दिली होती. सदर मिळकतीमध्ये त्याच्या वडिलांनी १९८५ साली घराचे बांधकाम केलेले असून उर्वरित जागा त्याच्या व या दाव्यातील प्रतिवादींच्या ताब्यात आहे. त्याचा दावा मिळकतीमध्ये हक्क व हिस्सा आहे. त्याबाबतचा दि. ३०.११.१९९० चा त्याच्याकडे करारनामा आहे. प्रतिवादी व त्याच्यामधील वादांचा गैरफायदा घेऊन वादींनी त्याला प्रस्तूत दाव्यात जाणीवपूर्वक समाविष्ट केलेले नाही.

**३**. अर्जदाराचे पुढे कथन की, त्याचे या न्यायालयामध्ये इतर मिळकतीं बाबत दावे प्रलंबित असून त्याकामी तो आला असता त्याला सदर दाव्याची माहिती झाली आहे. त्याचा अर्ज मंजूर केल्यास वादी व प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, अर्ज नामंजूर केल्यास त्याचे अपरिमित नुकसान होऊन दाव्याचे अंतिम निराकरण होणे अशक्य असल्यामुळे अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**४**. वादींनी नि. क्र. १३ प्रमाणे सदर अर्जास लेखी म्हणणे सादर करुन तीव्र आक्षेप घेतला आहे. वादींच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतीशी अर्जदाराचा कोणताही संबंध नसून प्रस्तूत अर्ज कायदेशीर तरतूदीं प्रमाणे चालण्यास पात्र नाही. अर्जदाराने जाणीवपूर्वक खोटया व रचनात्मक मजकूराच्या आधारे बनावट अर्ज सादर केलेला आहे. वादीचा प्रस्तूत दावा कायम मनाई हुकूमाच्या आदेशासाठी असून दाव्यासोबत दाखल केलेल्या समजुतीच्या

नकाशामध्ये प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या विरोधात आदेशाची मागणी केलेली आहे. अर्जदाराने दावा मिळकतीशी त्याचा संबंध असणारा कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. अर्जदाराने प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्याशी संगनमत करुन वादीने दावा घर मिळकतीचा ताबा मागितल्यामुळे प्रस्तूत दावा लांबणीवर टाकण्याकरीता बनावटी अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी देखील त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये अर्जदार हा दावा मिळकतीमध्ये हिस्सेदार असल्याचा कोणताही उल्लेख केलेला नाही. सबब, अर्ज नामंजूर केल्यामुळे अर्जदाराचे कोणतेही नुकसान होणार नसून प्रस्तूत अर्ज मंजूर झाल्यास वादीचे नुकसान होणार असल्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. प्रतिवादींना पुरेशी संधी देऊन देखील त्यांनी लेखी म्हणणे सादर केलेले नाही.

६. अर्जदार व वादींच्या वकिलांनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे. प्रतिवादींतर्फे वकील श्री. एस. एम. देशपांडे यांनी अर्जदाराला दाव्यात समाविष्ट करुन घेण्यास त्यांचा कोणताही आक्षेप नसल्याचा संक्षिप्त युक्तीवाद केला आहे.

७. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतीच्या मूळ मालक आणि वादीच्या पुर्वहक्कदारांनी गट क्र. २१७ पैकी ०.०६ आर जमीन अर्जदार व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या पुर्वहक्कदारांच्या ताब्यात दिलेली आहे. अर्जदाराचा दावा मिळकतीमध्ये हक्क व संबंध असल्यामुळे त्याने त्याला प्रस्तूत दाव्यात समाविष्ट करण्याची मागणी केली आहे. याउलट, वादींच्या कथनाप्रमाणे अर्जदाराचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नसून त्याच्या विरोधात कोणतीही मागणी केलेली नसल्यामुळे त्याला या दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ट करण्याची आवश्यकता नाही.

८. अर्ज व लेखी म्हणण्याचे अवलोकन केले असता, दि.प्र.सं. आदेश १ नियम १० च्या तरतूदींचे बारकाईने अवलोकन करणे गरजेचे आहे. सदर नियमाप्रमाणे आवश्यक पक्षकार म्हणून केवळ ज्या व्यक्तीच्या उपस्थितीने दाव्याचे अंतिमतः निराकरण होणे शक्य आहे अथवा त्याच्या गैरहजेरीमध्ये दाव्याचे अंतिम निराकरण होऊ शकत नाही त्याला

न्यायालय कोणत्याही वेळी आवश्यक तो पक्षकार म्हणून दाव्यात समाविष्ट करण्याचे आदेशित करु शकते. वादींनी प्रस्तूतचा दावा प्रथमतः कायम मनाई हुकूमनाम्यासाठी दाखल केला होता. वादींनी दि. ०९.०१.२०१४ रोजी दाव्यामध्ये दुरुस्ती करुन दावा घर मिळकतीचा खुला व निर्वेध ताबा प्रतिवादीं कडून मिळण्याची मागणी केलेली आहे.

**९.** अर्जदाराच्या कथनाप्रमाणे त्याचा दावा मिळकतीमध्ये हिस्सा आहे. वादींनी प्रस्तूतचा दावा गट क्र. ३१७ मधील ५१.३ आर क्षेत्रा बाबत दाखल केलेला आहे. वादींनी प्रस्तूत अर्जदाराच्या ताब्यातील मिळकती बाबत कोणतीही मागणी केलेली नाही. तसेच मनाई हुकूमाची व दावा घराचा ताबा मिळण्याच्या आदेशाची केवळ प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या विरुध्द मागणी केलेली आहे. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये वादीच्या पुर्वहक्कदारांनी त्यांच्या वडिलांच्या व इतर लोकांना अनोंदणीकृत खरेदीपत्राने जमिनीची विक्री केल्याचे कथन केलेले आहे. त्यांनी सदर मिळकतीच्या ०.०६ आर क्षेत्रामध्ये त्यांची पुर्वीपासून वहिवाट असल्याचे कथन केलेले आहे.

**१०.** प्रस्तूत अर्जदार हा प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचा भाऊ असून त्याचा त्यांच्या ताब्यातील ०.०६ आर मिळकतीमधील क्षेत्रात ताबा आहे. वादींचा दावा केवळ मनाई आदेशा पुरता मर्यादित असता तर प्रस्तूत अर्जदार हा या दाव्याकामी आवश्यक पक्षकार ठरला नसता. वादींनी दावा मिळकतीमधील घर मिळकतीच्या ताब्याची प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्याकडून मागणी केलेली आहे. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या कथनाप्रमाणे त्यांच्या पुर्वहक्कदारांच्या ताब्यात असलेल्या ०.०६ आर क्षेत्रामध्ये त्यांचा अर्जदारासह संयुक्त ताबा आहे. सबब, प्रस्तूत दाव्यास अर्जदाराला त्याची बाजू मांडण्यासाठी खुलासा करण्याची संधी देणे आवश्यक ठरते.

**११.** प्रस्तूतचा अर्ज मंजूर केल्यामुळे वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, अर्ज नामंजूर केल्यास प्रस्तूत अर्जदाराला त्याची बाजू मांडण्याची कोणतीही संधी मिळणार नाही. तसेच पुराव्याअंती दावा मंजूर झाल्यास वादींनी मागणी केलेल्या मिळकतीमध्ये प्रस्तूत अर्जदाराचा हिस्सा असल्यास हुकूमनाम्याची अंमलबजावणी होऊ शकणार नाही.

अर्जदाराचा प्रस्तूतचा अर्ज नामंजूर केल्यास दावा मिळकती बाबत एकापेक्षा जास्त कायदेशीर प्रकरणे निर्माण होण्याची शक्यता असून त्याचा अधिकार डावलला जाऊ शकतो. याउलट, त्याला दाव्यात समाविष्ट केल्यामुळे वादींचे कोणतेही नुकसान होणार नसून कायदेशीर गुंतागुंत टळून दाव्याचा गुणदोषावरती अंतिम निकाल लागू शकतो. त्यामुळे दाव्याच्या अंतिम निर्णयाच्या अनुषंगाने वादींची प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या विरोधातील मागणी विचारात घेता अर्जदाराला प्रस्तावित प्रतिवादी क्र. ५ म्हणून या दाव्यात समाविष्ट करणे न्यायोचित ठरते. सबब, मी वरील विवेचनावरुन खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

**<u>आदेश</u>**

१. अर्ज खालील प्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी प्रस्तूत अर्जदारास या दाव्याकामी प्रतिवादी क्र. ५ प्रमाणे समाविष्ट करुन दाव्यात नियमा प्रमाणे आवश्यक ती दुरुस्ती करुन सुधारीत प्रत दाखल करावी.

३. प्रस्तूत अर्जदाराला दाव्यात समाविष्ट केल्यानंतर त्याने कायद्याने विहित केलेल्या कालावधीमध्ये त्याची लेखी कैफियत दाखल करावी. तसेच त्याने त्याला या दाव्यात समाविष्ट केल्यानंतर हजर होण्यासाठी नव्याने आदेशिका काढण्याची कोणतीही आवश्यकता नसल्याची नोंद घेऊन आदेशाची पुर्तता करावी.

४. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी आवश्यकतेप्रमाणे त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये नियमा प्रमाणे विहित कालावधीमध्ये दुरुस्ती करण्यास सवलत आहे.

५. अर्जदार, वादी आणि प्रतिवादींनी आदेशाची नोंद घेऊन पुर्तता करावी.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

जे. ओ. कोड–एम.एच.०२८९७

दिनांक – २७.०८.२०२४. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.